**संक्षिप्त फौ.ख.क्र.१७००५/२०२२**
**सचिन वि. राजकुमारी**
**नि.क्र. ७४**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपी चे निवेदन**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नाव | - | राजकुमारी श्यामसुंदर राजपुत तथा राजकुमारी राजेंद्र राठोड |
| वय | - | ३६ वर्ष |
| धंदा | - | नोकरी, |
| रा.- | - | प्लॉट क्र. ५०, पुनापूर रोड, भवानी नगर, पारडी, नागपूर. |

**प्रश्न क्र. १ -** फिर्यादी पक्षाचा पुरावा ऐकला का व तो तुम्हाला समजला का ?
**उत्तर - होय.**

**प्रश्न क्र. २ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन देवीदास बाकरे यांचे पुराव्यात असे आले आहे की, त्यांचा एफ.एम.सी.जी. च्या वेगवेगळ्या वस्तु विक्रीचा व्यवसाय मे. ओम साई एजन्सीजच्या नावाने असुन तुम्ही त्यांच्याकडे संगणक ऑपरेटर म्हणुन कामास होता. तुम्ही मे. सुरुची स्पाईसेस प्रा.लि. मध्ये नोकरीस असतांना त्यांच्याशी आळख झाली होती. तुमचे व त्यांचे एकत्र कामातुन चांगले व विश्वासाचे संबंध निर्माण झाले. तुम्ही एप्रिल २०२१ मध्ये त्यांच्याकडे आर्थिक अडचण असल्याने घर खरेदीसाठी रक्कम रु. ३ लाख मागणी केली. त्यांनी तुम्हाला अडचण असल्याने रक्कम रु. ३ लाख रोख दिले ?
**उत्तर - हे खरे नाही.**

**प्रश्न क्र. ३ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्हाला जुन २०२१ मध्ये पुन्हा गरज पडल्याने तुम्ही त्यांच्याकडे हात उसनी रक्कम रु. ३ लाख मागणी केली. तुम्हाला तुमच्या वडीलांच्या व्यवसायासाठी सदर रक्कमेची गरज असल्याचे सांगितले. तुम्ही सदर रक्कम लवकरच परत करणार असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी तुम्हाला रक्कम रु. ३ लाख रोख दिले ?
**उत्तर - हे खरे नाही.**

**प्रश्न क्र. ४ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्हाला आक्टोबर २०२१ मध्ये अडचण असल्याने तुम्ही त्यांच्याकडे रक्कम रु. ४ लाख हात उसनी मागणी केली. तुम्हाला तुमच्या वडीलांच्या व्यवसायासाठी सदर रक्कमेची गरज असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी तुम्हाला रक्कम रु. ४ लाख रोख दिले. तुम्ही रक्कम रु. १० लाख वडीलांच्या व्यवसायातुन लवकरच परत करणार असल्याचे सांगितले ?
**उत्तर - मी १ लाख रुपये घेतले होते. ईतर मजकुर खरा नाही.**

**प्रश्न क्र. ५ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही त्यांना सदर रक्कम तुमच्या वडीलांनी मिळणा-या कर्जामधुन परत करणार असल्याचे सांगितल्याने त्यांनी तुम्हाला त्यांचे उत्तर त्यांच्याकडुन जमा करुन रोख रक्कम तुम्हाला दिली. तुम्ही त्यांना १०० रुपयाच्या स्टॅंपवर रक्कम रु. १० लाख देणे असल्याचे लिहुन दिले ?
**उत्तर - हे खरे नाही. मी फक्त को-या स्टॅंपवर सही करुन दिली होती.**

**प्रश्न क्र. ६ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही तुम्ही सदर पैसे देण्यासाठी फिर्यादीस रक्कम रु. १० लाखाचा क्र. ०४०६८६ दि. २९.०६.२०२२ आय.डी.बी.आय. बँक, शाखा- वर्धमान नगर, नागपूरचा चेक दिला. सदर चेक तुम्ही तुमचे कायदेशिर देणे देण्यासाठी दिला. सदर चेक भरल्यानंतर वटेल अशी खात्री तुम्ही फिर्यादीस दिली ?
**उत्तर - हे खरे नाही. मी फक्त सही करुन कोरा चेक दिला होता. त्यावर नाव व रक्कम लिहीली नव्हती. मी सिक्युरीटीसाठी चेक दिला होता.**

**प्रश्न क्र. ७ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादी सदरचा चेक त्यांचे खाते असलेल्या HDFC Bank, Nagpur दि. २९.०६.२०२२ रोजी भरला असता तो खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने न वटता परत आला. फिर्यादीस त्याची माहिती दि. ०१.०७.२०२२ रोजी झाली. फिर्यादीने तुम्हास चेक परत आल्याबाबत विचारले असता त्यांना तुम्ही धमकावले. तुम्हाला वकीलामार्फत दि. १४.०७.२०२२ रोजी नोटीस पाठविली असता तुम्ही नोटीस मिळुनही रक्कम दिली नाही ? त्यांच्या नोटीसीस खोटे उत्तर दिले ?
**उत्तर - हे खरे नाही. मी नोटीसीस उत्तर दिले होते.**

**प्रश्न क्र. ८ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. १ सचिन यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादीने कागदपत्र हातउसनी रक्कम घेतल्याबाबत पोच पावती, मुळ चेक, रिर्टन मेमो, नोटीस स्थळ प्रत, पोस्टाची पावती व पोच पावती, करारनामा ई. कागदपत्र दाखल केले आहेत ?
**उत्तर - मला माहित नाही.**

**प्रश्न क्र. ९ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. २ धमेंद्र विठ्ठलराव शिरपूरकर यांचे पुराव्यात असे आले आहे की, ते मे. सुरुची स्पाईसेस प्रा.लि. मध्ये तुमचे व फिर्यादीसोबत नोकरीस होते. तुमचे, फिर्यादी व त्यांचे एकत्र कामातुन चांगले व विश्वासाचे संबंध निर्माण झाले. त्यावेळी तुम्ही फिर्यादीकडुन एप्रिल २०२१ मध्ये रु. ३ लाख, जुलै २०२१ मध्ये ३ लाख व दि. १८.१०.२०२१ रोजी ४ लाख असे एकुण १० लाख हातउसने घेतले ४ लाख रकमपैकी १ लाख त्यांनी तुम्हाला रोख दिले. तुम्ही फिर्यादीच्या नावे रु. १००/- स्टॅंपपेपरवर त्यांच्या समक्ष रक्कम मिळाल्याबाबत पावती करुन दिली ?
**उत्तर - हे खरे नाही.**

**प्रश्न क्र. १० -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. २ धमेंद्र यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही फिर्यादीस रक्कम देण्यासाठी चेक क्र. ०४०६८६ दि. २९.०६.२०२२ आय.डी.बी.आय. बँक, शाखा- वर्धमान नगर, नागपूरचा रक्कम रु. १० लाखाचा चेक दिला. सदर चेक तुम्ही तुमचे कायदेशिर देणे देण्यासाठी दिला. सदर चेक भरल्यानंतर वटेल अशी खात्री तुम्ही फिर्यादीस दिली ?

**उत्तर - हे खरे नाही.**

**प्रश्न क्र. ११ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. ३ प्रियंका गजानन पटले यांचे पुराव्यात असे आले आहे की, त्या ओम साई एजंसी येथे संगणक ऑपरेटर म्हणुन काम करतात. तुम्ही फिर्यादीच्या कार्यालयात येत असल्याने त्या तुम्हाला ओळखतात. त्यावेळी तुम्ही फिर्यादीकडुन एप्रिल २०२१ मध्ये रु. ३ लाख, जुलै २०२१ मध्ये ३ लाख व दि. १८.१०.२०२१ रोजी ४ लाख असे एकुण १० लाख हातउसने घेतले. ४ लाख रकमपैकी १ लाख त्यांनी तुम्हाला त्यांचे मित्र धमेंद्र शिरपूरकर यांच्या मार्फत रोख दिले. तुम्ही फिर्यादीच्या नावे रु. १००/- च्या स्टॅंपपेपरवर त्यांच्या समक्ष रक्कम मिळाल्याबाबत पावती करुन दिली ?

**उत्तर - हे खरे नाही.**

**प्रश्न क्र. १२ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. ३ प्रियंका यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही फिर्यादीस रक्कम देण्यासाठी चेक क्र. ०४०६८६ दि. २९.०६.२०२२ आय.डी.बी.आय. बँक, शाखा- वर्धमान नगर, नागपूरचा रक्कम रु. १० लाखाचा चेक दिला. सदर चेक तुम्ही तुमचे कायदेशिर देणे देण्यासाठी दिला. सदर चेक भरल्यानंतर वटेल अशी खात्री तुम्ही फिर्यादीस दिली ?

**उत्तर - हे खरे नाही.**

**प्रश्न क्र. १३ -** फिर्यादी पक्षाचे साक्षीदार क्र. ४ अमीत रमेशचंद्र अग्रवाल यांचे पुराव्यात असे आले आहे की, ते एच.डी.एफ.सी. बँक, शाखा सि.ए. रोड येथे सहा. शाखा व्यवस्थापक असुन त्यांनी फिर्यादीच्या खात्याचा दि. ०१.०४.२०२१ ते ०१.०५.२०२१ या कालावधीचा खाते उतारा प्रमाणपत्रासह दाखल केला. तसेच त्यांनी दि. ०१.०६.२०२१ ते २८.०६.२०२१ व ०१.१०.२०२१ ते ०१.११.२०२१ या कालावधीचे खाते उतारे दाखल केले. त्यांनी खाते उतारे व प्रमाणपत्र यातील मजकुर मान्य केला ?

**उत्तर - मला माहित नाही.**

**प्रश्न क्र. १४ -** फिर्यादी पक्षाचे साक्षिदार तुमच्याविरुद्ध का साक्ष देतात ?

**उत्तर - मी फिर्यादीकडुन १ लाख घराच्या कामासाठी घेतले होते. त्यावेळी सेक्युरिटीसाठी कोरा स्टॅंप व चेक दिला होता. मी नोकरी करीत असल्याने त्यातुन आल्यानंतर पैसे परत करण्यासाठी गेले असता त्यांनी मला प्लॉट देण्यास सांगितले. त्यांच्याकडे माझ्या पलॉटचे मुळ खरेदी खत देखील आहे. त्यांनी मला धमकी देखील दिली.**

**प्रश्न क्र. १५ -** तुम्हाला स्वतःला किंवा ईतर कोणाला शपथेवर साक्षीदार म्हणुन तपासायचे आहे काय ?
**उत्तर - होय.**

**प्रश्न क्र. १६ -** तुम्हाला ईतर काही पुरावा द्यायचा आहे काय ?
**उत्तर - होय.**

**प्रश्न क्र. १७ -** या केसबद्यल अजुन काही सांगायचे आहे काय ?
**उत्तर -** खोटी केस केली आहे. स्टँपवर माझी सही नाही.

**आरोपीची सही/अंगठा** **माझ्या समक्ष**

-------------------------------

BHARAT VITTHAL BURANDE
Digitally signed by BHARAT VITTHAL BURANDE
Date: 2025.12.16 17:17:28 +0530

**नागपूर** **(बी. व्ही. बुरांडे)**
**दिनांक – १६/१२/२०२५** **२६ वे अती.मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली सही करणार यांनी आरोपीचे बयान समक्ष घेतले असुन ते त्याने जे सांगितले आहे त्याप्रमाणे पुर्ण सत्य समाविष्ट केले आहे. सबब, हे प्रमाणपत्र दिले.

**नागपूर** **(बी. व्ही. बुरांडे)**
**दिनांक – १६/१२/२०२५** **२६ वे अती.मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर.**